(1)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

मुंबई नाका पोलीस स्टेशन नाशिक शहर

1. District (जिल्हा): नाशिक शहर    P.S.(ठाणे): मुंबई नाका पोलीस स्टेशन
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0230    Year (वर्ष): 2024
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):08/08/2024 16:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)इ |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 22/10/1986
Date To ( दिनांक पर्यंत): 31/05/2018
Time From (वेळेपासून): 00:00 बजे
Time To (वेळेपर्यंत): 00:00 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 08/08/2024    Time (वेळ): 16:44 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):
Entry No. (नोंद क्र.): 027
Date & Time (दिनांक आणि वेळ): 08/08/2024 16:44 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पूर्व, 04 किमी    Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): नाशिक महानगरपालिका नाशिक,नाशिक

(c) In case, outside the limit of this Police Station, then
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नितीन नारायण पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,मुंबई नाका पोलीस स्टेशन,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,मुंबई नाका पोलीस स्टेशन,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9284661658

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल चुडामण महाजन | | | 1. 102,उंटवाडी रोड,नयनतारा हिल्स,संचार भवन मागे, ,मायको सर्कल, नाशिक ,मुंबई नाका पोलीस स्टेशन,नाशिक शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ.निशा अनिल महाजन | | | 1. 102,उंटवाडी रोड,नयनतारा हिल्स, संचार भवन मागे,मायको सर्कल, नाशिक ,मुंबई नाका |



Scanned with OKEN Scanner

पोलीस स्टेशन,नाशिक शहर
महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

लेखी

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10. **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद मुंबई नाका पोलीस ठाणे, नाशिक शहर
दिनांक 08/08/2024

मी नितीन नारायण पाटील, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी जुलै 2023 पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

अर्जदार श्री.सतिश बाबुराव कदम, रा. प्लॉट नं.15, अपुर्वा कॉलनी, शिवराम नगर, ना.रोड, नाशिक. यांनी गै.अ. लोकसेवक श्री अनिल चुडामण महाजन, तत्कालीन मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका, नाशिक यांचेविरुध्द केलेल्या तक्रारी अर्जावरुन गै.अ.यांचेविरुध्द मा.मुख्यालयाकडील जा.क्रं. डी/467/नाशिक/2017/ 8160 दि. 16/08/2017 अन्वये प्राप्त 'डी' प्रकरणातील आक्षेपांची गोपनियरित्या पडताळणी करुन तत्कालीन पोलीस निरीक्षक, एच.एस.भामरे यांनी गै.अ.अनिल महाजन यांचे मालमत्तेची उघड चौकशी होणेकरीता मा.मुख्यालयास अहवाल सादर केला होता. सदर अहवालाचे अवलोकनांती गै.अ. यांचेविरुध्द मा.मुख्यालयाने प्रस्तुत प्रकरणी मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.चै.उघड/71/नाशिक/2018/5025 दि. 31/05/2018 अन्वये मालमत्तेची उघड चौकशीकरण्याचे निर्देश दिलेले आहेत. तत्कालीन पो.नि.एच.एस.भामरे यांना प्रस्तुत प्रकरणात मालमत्तेची उघड चौकशीकरणेबाबत आदेशीत केले आहे. त्यानंतर प्रस्तुत प्रकरण हे पो.नि.एच.एस.भामरे यांचेकडुन पो.नि.चंद्रसेन पालकर यांना अतिरिक्त कार्यभारात देण्यात आले होते. त्यानंतर सदर उघड चौकशीप्रकरण हे तत्कालीन चौकशी अधिकारी पो.नि. अनिल बागुल यांना कार्यभारात माहे जुन 2021 मध्ये प्राप्त झालेले होते.
अर्जदार यांनी तक्रार अर्जात आक्षेप केले आहेत की, गै.अ. अनिल चुडामन महाजन, चिफ फायर ऑफिसर हे नाशिक महानगरपालिका येथे ब-याच वर्षापासुन फायर विभागाच्या अटी शर्तीचे बाबतीत त्यांनी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी नियम बनवुन अशा प्रकारच्या इमारतींना ना हरकत दाखला देतात. जरी फायर सिस्टीमचे उपकरणे कमी बसविलेले असले व काही यंत्रणा नियमानुसार नसतांना कमी क्षमतेच्या बसविलेल्या असतांना देखील व काही यंत्रणा बांधकाम प्रत्यक्ष जागेवर अस्तित्वात नसतांना देखील फायर विभागाच्या नियमांना अटी, शर्तींना बगल देवुन स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी गै.अ.यांनी ॲफेडेव्हिट (प्रतिज्ञापत्र) हा एक सुवर्णमध्ये षोधुन काढलेला आहे. गै.अ. यांची अथर्व एंटरप्राईजेस या फायर सिस्टीम एजन्सी मध्ये पार्टनरशिप असुन ते बिल्डरांना धमकावुन अथर्व एंटरप्राईजेस ह्याच एजन्सीला बिल्डिंगचे फायर सिस्टीमचे कामे देण्यास भाग पाडतात. तसेच त्यामुळे दहशतीखाली घाबरुन सदर व्यावसायिक बिल्डर गै.अ.यांच्या कंपन्यांनाच काम देतात. तसेच इतर एजन्सी कडुन केलेल्या



Scanned with OKEN Scanner

कामांच्या बाबतीत जर ना हरकत दाखला पाहिजे असेल तर गै.अ. हे सदर एजन्सीकडुन ना हरकत दाखल्यापोटी 25 हजार ते 3 लाख रुपये पर्यंत पैशांची मागणी करतात. संबंधित एजन्सीने पैसे देण्यास नकार दिला तर त्यांचे कामांमध्ये त्रुटी आहेत, त्या प्रथम पुर्ण करा असे सांगुन ना हरकत दाखला देत नाही.
तसेच गै.अ. महाजन हे बिल्डरांना तुमच्या साईटवर जनरेटर बसविलेले नाही, तुम्ही बसविलेली लिप्टची कपॅसिटी नियमानुसार नाही, पाण्याच्या टाकीची क्षमता नियमानुसार नाही इत्यादी प्रकारच्या त्रुटया दाखवुन बिल्डरांना ना हरकत दाखल्यासाठी त्रस्त करतात व यातुन आपण मार्ग काढु असे सुचवुन सदर बिल्डरांना दुस-या दिवशी बोलावुन घेवुन त्यांना त्यांच्या कामातील त्रुटींची माहिती देवुन दोन ते तीन लाखापर्यंतचा खर्च काढुन देतात व यातुन तुम्ही मला निम्मे पैसे दया व निम्म्या पैशांचा तुमचा फायदा होईल असे सांगुन साईटवर बसविण्यात आलेल्या अग्निशमन उपकरणाच्या ज्या कमतरता आहेत त्या मी तीन ते सहा महिन्यात पुर्ण करेल असा प्रतिज्ञापत्र बनवुन आणुन दयायला सांगतात.
गै.अ. यांचे विरुध्दच्या प्राप्त तक्रार अर्जामधील आक्षेपांप्रमाणे तत्कालीन पो.नि. अनिल बागुल यांनी महानगरपालिका, नाशिक यांचेकडुन माहिती प्राप्त केलेली आहे. तसेच गै.अ.यांच्या मालमत्तेसंदर्भात संबंधित ठिकाणचे तलाठी कार्यालय, सह.दुय्यम निबंधक कार्यालय, बॅक, कृषी कार्यालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पॉलीसी कार्यालय व इतर संबंधीत कार्यालय इत्यादी ठिकाणांहुन तसेच गै.अ.यांचेकडुन माहिती प्राप्त आली आहे. गै.अ. अनिल चुडामण महाजन हे माहे ऑक्टोबर- 1986 मध्ये अग्निशमन अधीक्षक, वर्ग 2 म्हणुन अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नाशिक येथे नोकरीस लागले होते. त्यानंतर गै.अ.हे मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, महानगरपालिका, नाशिक या पदावरून माहे जुलै - 2018 मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. गै.अ.यांची महानगरपालिका, नाशिक येथे एकुण 32 वर्षे सेवा झालेली आहे.
गै.अ. यांना वैध मार्गाने चौकशी कालावधी दिनांक 22/10/1986 ते दिनांक 31/05/2018 पावेतो एकुण 3,06,42,225/- रुपये उत्पन्न मिळालेले आहे. तसेच गै.अ.यांचे चौकशी दरम्यान प्राप्त माहितीनुसार त्यांचा चौकशी कालावधी पावेतोचा एकुण 1,76,19,869/- रुपये खर्च झालेला आहे.
एकंदरीत वरील प्रमाणे गै.अ.यांचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च यांचा विचार करता गै.अ.यांना कायदेशिर मार्गाने 3,06,42,225/- रुपये उत्पन्न मिळाले असुन त्यातुन त्यांचा व त्यांचे कुटूंबियांचा खर्च 1,76,19,869/- रुपये वजा जाता त्यांचेकडे 1,30,22,356/- रुपये संभाव्य शिल्लक असल्याचे दिसुन येते. त्यातुन गै.अ. यांनी संपादित केलेली मालमत्ता 2,61,65,225/- रुपये वजा जाता गै.अ.यांनी त्यांचे शासकीय नोकरीचे कालावधीमध्ये 1,31,42,869/- रुपयांची 42.89 टक्के एवढी अपसंपदा केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्याने, गै.अ. अनिल चुडामण महाजन, यांचे मालमत्तेचे उघड चौकशीप्रकरणात गै.अ. यांचेविरूध्द अपसंपदा सदरी भ्रष्टाचारप्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 13(1)(ब) प्रमाणे तसेच गै.अ.यांच्या पत्नी सौ.निशा अनिल महाजन यांनी गै.अ.यांना अपसंपदा संपादीत करणेकामी प्रोत्साहन केल्याने त्यांचेविरूध्द भ्रष्टाचारप्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळणेस विनंती आहे. असा अहवाल तत्कालीन चौकशीअधिकारी पो.नि. अनिल बागुल यांनी इकडील कार्यालयाकडील जा.क्र. 301 दिनांक 08/07/2023 अन्वये परिक्षेत्र कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे मार्फतीने मुख्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे सादर केला होता. दरम्यान मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे आदेशान्वये पोनि/श्री. अनिल बागुल यांची बदली मुंबई शहर येथे झाल्याने, मा. पोलीस अधिक्षक, लाप्रवि, नाशिक यांचे आदेशाने सदरचे प्रकरण माहे जुलै 2023 मध्ये आमचेकडे कार्यभारात प्राप्त झाले होते.
तत्कालीन चौकशीअधिकारी पो.नि. अनिल बागुल यांनी सादर केलेल्या सदर अहवालाचे अवलोकनांती मुख्यालयाकडील जा.क्र. 301 दिनांक 08/07/2023 च्या आदेशान्वये सदर प्रकरणात गै.अ. अनिल चुडामण महाजन, सेवानिवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका, नाशिक यांचेविरूध्द अपसंपदा सदरी भ्रष्टाचारप्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 13(1)(ब) प्रमाणे तसेच गै.अ.यांच्या पत्नी सौ.निशा अनिल महाजन यांनी गै.अ.यांना अपसंपदा संपादीत करणेकामी प्रोत्साहन केल्याने त्यांचेविरूध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी प्राप्त झाल्याने, गै.अ.यांचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च यांचा विचार करता गै.अ.यांना परिक्षण कालावधी दिनांक 22/10/1986 ते दिनांक 31/05/2018 पावेतो कायदेशिर मार्गाने 3,06,42,225/- रुपये उत्पन्न मिळाले असुन त्यातुन त्यांचा व त्यांचे कुटूंबियांचा खर्च 1,76,19,869/- रुपये वजा जाता त्यांचेकडे 1,30,22,356/- रुपये संभाव्य शिल्लक असल्याचे दिसुन येते. त्यातुन गै.अ. यांनी संपादित केलेली मालमत्ता 2,61,65,225/- रुपये वजा जाता गै.अ.यांनी त्यांचे शासकीय नोकरीचे कालावधीमध्ये 1,31,42,869/- रुपयांची 42.89 टक्के एवढी अपसंपदा केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे म्हणुन, गै.अ. श्री अनिल चुडामण महाजन, वय -58 वर्षे मुख्य अग्निशमन अधिकारी (सेवानिवृत्त),



Scanned with OKEN Scanner

महानगरपालिका, नाशिक. रा. फ्लॅट नं. बी/102, नयनतारा हिल्स, संचार भवन मागे, उंटवाडी रोड, मायको सर्कल, नाशिक. यांचेविरूध्द सदर गुन्हा घडल्याचा कालावधी हा दिनांक 22/10/1986 ते दिनांक 31/05/2018 दरम्यान असल्याने सदर कालावधीत भ्रष्टाचारप्रतिबंध अधिनियम 1988 चे सन 2018 सुधारणा पुर्वीचे कलम 13(1)(ई) तसेच गै.अ.यांच्या पत्नी सौ.निशा अनिल महाजन यांनी गै.अ.यांना अपसंपदा संपादीत करणेकामी प्रोत्साहन केल्याने त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 12 प्रमाणे फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली
दिनांक 08/08/2024
(नितीन पाटील)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Santosh Babanrao Narute(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

मुंबई नाका पोलीस स्टेशन नाशिक शहर

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
मुंबईनाका पोलीस स्टेशन
नाशिक शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Santosh Babanrao N
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI



Scanned with OKEN Scanner